# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि –४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थपित राज्य विद्यापीठ)

*(आस्थापना विभाग)*

एम.आय.डी.सी. रोड कॉम्प्लेक्स गडचिरोली – ४४२६०५
फोन नंबर ०७१३२–२१६५९२

क्र. गो.वि/आस्था/१३६४/२०१७ दि. :१२ /०६/२०१७

## परिपत्रक

**विषय** :—कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून सरंक्षण(प्रतिबंध,मनाई आणि निवारण)अधिनियम —२०१३ व नियम ०९/१२/२०१३ अंतर्गत तक्रार समिती स्थापन करणेबाबत.

**संदर्भ** :— मा. जिल्हाधिकारी ,चंद्रपूर यांचेकडून प्राप्त झालेले पत्र क्रं. जिमबाविअ/चंद्रपूर/अशाप/२०१७—१८/२३०, दिनांक ३०/५/२०१७.

गोंडवाना विद्यापीठातील संलग्नीत सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्याना सुचित करण्यात येते की, उपरोक्त संदर्भिय पत्रानुसार कामाच्या ठिकाणी महिलांच्या लैंगिक छळ संरक्षण (प्रतिबंध मनाई आणि निवारण) अधिनियम—२०१३ व नियम ०९/१२/२०१३ नुसार प्रत्येक कार्यालयात "अंतर्गत महिला तक्रार निवारण समिती" स्थापन करणे अनिवार्य आहे. अधिनियम कलम २६ अन्वये ज्या कार्यालयात अंतर्गत तक्रार समिती स्थापन करण्यात आलेली नाही. अशा कार्यालयाच्या मालकांना ५०,०००/— पर्यंत दंड आकारण्याची तरतुद केलेली आहे. ज्या महाविद्यालयांनी अजुनपर्यंत समिती स्थापन केलेली नसेल त्यांनी एक महिण्याच्या आत समिती स्थापन करावी. समिती स्थापन केल्याचा अहवाल **जिल्हा महिला बाल विकास अधिकारी कार्यालय, जुना कलेक्टर बंगला,सिव्हील लाईन्स, चंद्रपूर** यांना सादर करावा. तसेच अंतर्गत तक्रार समितीचा वार्षिक अहवाल तयार करुन दरवर्षी १५ एप्रिल पर्यंत जिल्हा महिला बाल विकास अधिकारी कार्यालयास सादर करावा. तसेच सदर अहवालाची एक प्रत विद्यापीठाला सादर करण्यात यावी.

**सहपत्र संलग्नः—**

१.उपरोक्त संदर्भिय पत्र.

(दिपक एस. जुनघरे)
कुलसचिव(का)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

आशुतोष सलिल
भा.प्र.से.
जिल्हाधिकारी, चंद्रपूर

जा.क्रं.जिमबाविअ/चंद्रपूर/अशाप/अंतस/२०१७-१८/230
दिनांक - 30/05/2017

**विषय : कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासुन संरक्षण (प्रतिबंध, मनाई आणि निवारण) अधिनियम - २०१३ व नियम ०९/१२/२०१३ अंतर्गत तक्रास समिती स्थापन करणेबाबत.**

कामाच्या ठिकाणी महिलांच लैंगिक छळापासून सरंक्षण अधिनियम २०१३ व नियम ९/१२/२०१३ आणि महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्र.मकचौ-२०१३/प्र.क्र.६३/मकक-दि.१९-६-२०१४ अन्वये प्रत्येक शासकीय, निमशासकीय, खाजगी कार्यालय, संस्था इत्यादी मध्ये ज्या आस्थापनेमध्ये १०किंवा १० पैक्षा अधिक अधिकारी/ कर्मचारी यांचा समावेश असेल अशा प्रत्येक नियोक्त्याने आपल्या आस्थापनेमध्ये शासननिर्णय आणि कायदयान्वये अंतर्गत तक्रार सांमती स्थापन करणे अनिवार्य आहे. सदर अधिनियमाच्या कलम २६ अन्वये ज्या कार्यालयात अंतर्गत तक्रार समिती स्थाप्न करण्यात आलेली नाही अश्या कार्यालयाच्या मालकास रुपये ५००००/-(पन्नास हजार) पर्यंत दंड आकारण्याची तरतूद आहे.

करिता सर्व कार्यालय प्रमुखांनी आपल्या अधिनस्थ जिल्हयातील प्रत्येक कार्यालयात अंतर्गत तक्रार समिती, महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र.मकचौ-२०१३/प्र.क्र.६३/मकक-दि.१९-६-२०१४ अन्वये एक महिन्याच्या आत स्थापन करावी. सदर समिती स्थापन केल्याचा अहवाल समिती आदेशासह **जिल्हा महिला बाल विकास अधिकारी कार्यालय, जुना कलेक्टर बंगला, सिव्हील लाईन्स, चंद्रपूर** यांना सादर करावा. प्रत्येक कार्यालयाला समिती गठीत झाल्यावर अंतर्गत तक्रार समितीच्या सदस्यांची नावे व संपर्क तपशील कार्यालयाच्या दर्शनीय भागात लावण्यात यावे. सदर अधिनियमाच्या कलम २१ अन्वये अंतर्गत तक्रार समितीचा वार्षिक अहवाल तयार करुन दरवर्षी १५ एप्रिल पर्यंत जिल्हा महिला बाल विकास अधिकारी कार्यालयास दयावा.

प्रत्येक कार्यालयात अंतर्गत तक्रार समिती स्थापन करणे कायदयाअन्वये आणि शासननिर्णयानुसार असणे आवश्यक असल्याने आपण आपल्या अधिनस्थ सर्व कार्यालयात तात्काळ समितीचे गठन करुन अहवाल जिल्हा महिला बाल विकास अधिकारी कार्यालयास सादर करावा.

(आशुतोष सलिल)
जिल्हाधिकारी

प्रति,
कुलगुरु
गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली
ता.जि. - गडचिरोली